# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२३ सप्टेंबर, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६५ वी बैठक मंगळवार, दि.२३ सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर | सदस्या |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| १२) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १३) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १४) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १५) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. शेख ए. ए. यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ] दि.१९ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव:** **दि.१९ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१) पान क्र.३१ वर ठराव क्र.१२ मधील ओळ क्र.३ व ४ मध्ये, "३० दिवसाच्या" ऐवजी "०७ दिवसात" अशी दुरुस्ती करण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम. सी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म. वि. कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा.अध्यक्ष, कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला एम. सी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर महाविद्यालयास एम. सी. ए. या अभ्यासक्रमास शै.वर्ष २००७-०८ पासून ए. आय. सी. टी. ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००७-०८ पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या एम. सी. ए. भाग १ या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, एम. सी. ए.या अभ्यासक्रमास प्रवेश क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी सख्या भरल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून एम. सी. ए. हा अभ्यासक्रम बंद करण्यास्तव रितसर शुल्क भरुन प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालीलप्रमाणे त्रीसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे (अध्यक्ष)
२. डॉ. व्ही. बी. घुटे (सदस्य)
३. डॉ. एस. आर. गेंगजे (सदस्य)

उपरोक्त समितीने संबधित महाविद्यालयास भेट देवून संबधित महाविद्यालयातील शै.वर्ष २०१४-१५ पासून एम. सी. ए. हे अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए. आय. सी. टी. ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातर्गत येणारे

विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए. आय. सी. टी. ई कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची बैठक दि.१६/०८/२०१४ रोजी संपन्न झालेली आहे व नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम. सी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून टप्प्याटप्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम. सी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून टप्प्याटप्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म. वि. कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः** **कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम. सी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भात म. वि. कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी स्थानिक चौकशी समितीने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्यावतीने स्विकारुन विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली.**

**[ ०४ ] कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता शै. वर्ष २०१४-१५ पासून ९० वरुन ६० अशी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा.अध्यक्ष, कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला मेकनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून ९० वरुन ६० अशी कमी करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर महाविद्यालयास मेकनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २००९-१० पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० वरुन ९० अशी जादा करण्यास ए. आय. सी. टी. ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००९-१० पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त ३०(६०+३०=९०) विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, गत दोन वर्षापासून सदरील अभ्यासक्रमास मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा अत्यल्प विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याने संस्थेचे खूप आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०(६०+३०=९०) म्हणजेच विद्यार्थी क्षमता ९० वरुन ६० करण्यास्तव रितसर शुल्क भरुन प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य डॉ.एस.ए.हलकुडे (अध्यक्ष)
२. श्री एस.एन.कुलकर्णी (सदस्य)
३. डॉ.एस.एस.काशिद (सदस्य)

उपरोक्त समितीने संबधित महाविद्यालयास भेट देवून संबधित महाविद्यालयातील

मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरुन ६० अशी करण्याची शिफारस केलेली आहे.

ए. आय. सी. टी. ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए. आय. सी. टी. ई. कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेकची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची बैठक दि.१६/०८/२०१४ रोजी संपन्न झालेली आहे व नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदययांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला मेकॅनिकल इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून ९० वरुन ६० कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला मेकॅनिकल इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून ९० वरुन ६० कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता शै. वर्ष २०१४-१५ पासून ९० वरुन ६० अशी करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भात म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा अंशत: विस्तार करण्याबाबत परिनियमात बदल करण्याची विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागाकडील दि.११/०८/२०१४ रोजीच्या टिपणीन्वये मा.कुलगुरुमहोदय व मा.अधिष्ठाता कला व ललित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्रे, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या समवेत दि.०५/०८/२०१४ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत सर्वकष चर्चेनुसार वाणिज्य (Commerce) विद्याशाखेतंर्गत बी. बी. ए., बी. सी. ए., एम. बी. ए., व एम. सी. ए इ. अभ्यासक्रम समाविष्ट असल्याने या विद्याशाखेचे नाव वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असणे गरजेचे आहे असे ठरले होते.

वरीलप्रमाणे झालेल्या सर्वकष चर्चेनुसार वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा अंशत: विस्तार करणे बाबत परिनियमातील बदल करणेची बाब दि.१६ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.११३ (८) अन्वये विचारात ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव:** | **वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा विस्तार करण्यासाठी परिनियमात बदल करण्याची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब, वरील ठरावाच्या अनुषंगाने वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा विस्तार करण्यासाठी परिनियमात बदल करण्यासंदर्भात विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा विस्तार करण्याबाबत परिनियमात बदल करण्याची विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन तशी शिफारस अधिसभेस करावी यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करणे संदर्भात विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागाची दि.११/०८/२०१४ रोजीच्या टिपणीन्वये मा.कुलगुरुमहोदय व मा.अधिष्ठाता कला व ललित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्रे, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या समवेत दि.०५/०८/२०१४ रोजी संयुक्त बैठक झाली. सदर बैठकीत अभियांत्रिकी विद्याशाखेतंर्गत समावेश असलेला औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन त्या संदर्भात स्वतंत्र औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही विद्याशाखा निर्माण करणे बाबत सर्वकष चर्चा झाली आहे.

वरीलप्रमाणे झालेल्या चर्चेनुसार अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्याची बाब दि.१६ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.११३(९) अन्वये विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव पास झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठरावः** | **अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करण्याची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब, वरील ठरावाच्या अनुषंगाने अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करण्यासंदर्भात विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करणे संदर्भात विद्या परिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन तशी शिफारस अधिसभेस करावी यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा. चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला यांचेकडून संस्था संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला. ता.सांगोला, जि.सोलापूर** | **विज्ञान महाविद्यालय, सांगोला. ता.सांगोला, जि.सोलापूर** | **शै.वर्ष २०१३-१४ पासून** | **बी. बी. ए.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासन आदेश क्र.एनजीसी २००९ / (१६९/०९) / मशि-४, दि.११ जुलै, २००९ अन्वये महाराष्ट्र शासनाची शै.वर्ष २००९-१० पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाने संलग्निकरणाची सर्व कार्यवाही पूर्ण करुन बी. बी. ए. या नवीन अभ्यासक्रमास विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेन्वये शै.वर्ष २०१०-११ पासून सुरु करण्यास मान्यता दिलेली होती. परंतु पुरेशा विद्यार्थी संख्ये अभावी संस्थेने बी. बी. ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून बी. बी. ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. डॉ. ए.ए. शेख (अध्यक्ष)**
**२. प्राचार्य, डॉ.आर.आर. पाटील (सदस्य)**
**३. श्री. एन.एन. तंटक (सदस्य)**

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून महाविद्यालयातील बी. बी. ए. अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबतची बाब व सन २०१३-१४ हे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आले असल्याने सदर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची बाब दि.१६/०८/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.४३ अन्वये सदर महाविद्यालयातील बी. बी. ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी. बी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ ०८ ] विद्यापीठ परिसरातील बांधकाम करणे या कामाकरिता दि.०४/०९/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात करावयाच्या विविध बांधकामाबाबत बांधकाम समितीची बैठक दि.०४/०९/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत विषय क्र.०१ ते ०४ ठेवण्यात आले असता ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव शिफारस करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ परिनियम S.339 (f) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

| |
|---|
| After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council for its approval. |

उक्त तरतुदीनुसार दि.०४/०९/२०१४ रोजीचा बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव: विद्यापीठ परिसरात करावयाच्या विविध बांधकामासंदर्भात दि.०४/०९/२०१४ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] ग्रंथालय समितीच्या दि.०५/०८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी: ग्रंथालय समितीची दि.०५/०८/२०१४ रोजी बैठक झाली. विषय पत्रिकेवर पुस्तके व नियतकालिके खरेदी, वार्षिक खर्च व वार्षिक अहवाल इ. विषय विचारार्थ होते. ग्रंथालय समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(१) (ग) (३), (४) व (५) अन्वये मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, ग्रंथालय समितीच्या दि.०५/०८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव).

**ठराव: ग्रंथालय समितीच्या दि.०५/०८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास मान्यता देवून त्यातील विषय क्र.५.१ (अ) आणि (ब), ५.२, ५.३, ५.४, ५.५ व ५.७ नुसार कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. एल. एल. बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अंतिम वर्षात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता श्री. धर्मराज काडादी, सचिव, श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी १,००,०००/- (एक लाख) देणगी दाखल सादर केलेल्या पत्राबाबत व सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ठ करणेबाबत विचारार्थ.**

(टिपणी: श्री. धर्मराज काडादी, सचिव, श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी त्यांच्या पत्रात सोलापूर विद्यापीठात बी.ए.एल.एल.बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने येणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक"** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे, याकरिता श्री. धर्मराज काडादी यांनी रु.१,००,०००/ (अक्षरी रुपये एक लाख) देणगीदाखल देवू इच्छितात. सदरच्या रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील सुवर्णपदक देण्यात यावे. तथापि, दहावा दीक्षांत समारंभात सदरचे सुवर्णपदक देण्याकरिता आवश्यक तो खर्च श्री. धर्मराज काडादी यांनी स्वत: करण्यास तयार आहेत.

सदर सुवर्णपदकांसाठी नियमावली तयार करण्याकरिता समिती गठीत करणे आवश्यक असल्याने समिती सदस्यांच्या नामनिर्देशास्तव.

मा.सचिव, श्री. धर्मराज काडादी यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ज) नुसार विचारार्थ).

ठराव: **सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातून एल. एल. बी. (पाच वर्ष कोर्स) च्या अंतिम वर्षात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता श्री. धर्मराज काडादी, सचिव, श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी "स्वर्गीय मेघराज काडादी स्मृती सुवर्णपदक" साठी रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यात येवून या सुवर्णपदकासाठी नियमावली तयार करण्याकरिता डॉ. सुर्यवंशी एस. एस. व ॲड. सलगर बी. एस. यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] दहाव्या दीक्षांत समारंभात मार्च / एप्रिल २०१४ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर २०१४ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब विद्या परिषदेच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करणे याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ९६(१) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे. या अनुषंगाने दि.१६/०८/२०१४ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.११३(६) नुसार शिफारस करण्यात आलेली आहे.

**"व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु आणि प्रदान करता येतील".**

वरील तरतूद विचरात घेता मार्च / एप्रिल २०१४ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर २०१४ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ९६(१) नुसार विद्या परिषदेच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः मार्च / एप्रिल २०१४ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर २०१४ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना दहाव्या दीक्षांत समारंभात पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ ऑगस्ट, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील 'गट अ/ब' मधील अधिकारी / कर्मचा-यांच्या वेतन अनुदान निर्धारणाबाबत केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.१६/०३/२०१३ व दि. ०६/०४/२०१३ पत्रासोबत सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधतील वेतन अनुदान निर्धारण अहवाल प्राप्त झाले. सदर अहवालामध्ये अनुभव नसताना नेमणूका केल्याने संबंधित अधिकारी यांचे वेतन अमान्य करण्यात आल्याचे नमूद केले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि. १८/०४/२०१३ च्या पत्रान्वये संबंधित अधिका-यांकडून त्यांचे लेखी म्हणणे व खुलासा दि. २५/०४/२०१३ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदरचा अहवाल दि. २२/०४/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवला असता व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे निर्णय घेतला होता.

"संबंधित सर्व कर्मचा-यांकडून खुलासा आल्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर चर्चा करुन मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांच्याकडे अपील करण्यात यावे व अपीलाच्या निर्णयानुसार विद्यापीठाने कार्यवाही करावे असे ठरले."

त्यानुसार वेतन अमान्य झालेल्या यादीतील १८ पैकी १२ अधिका-यांचे खुलासे दि.०९ मे, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवले असता व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

"वेतन अमान्य झालेल्या यादीतील १८ पैकी १२ अधिका-यांचे खुलासे विद्यापीठाकडे सादर झाले आहेत. त्याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना व्यवस्थापन परिषदेसमोर बोलाविण्यात आले. खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या खुलाश्याप्रमाणे मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांच्याकडे अपील करण्याचे व त्याची बाजू विद्यापीठ प्रशासनाने मांडण्याचे ठरले".

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्रीमती अर्चना बाबासाहेब चोपडे | सहायक कुलसचिव |
| २) | श्री. कांबळे सुर्यकांत नंदकुमार | सहायक कुलसचिव |
| ३) | श्री. पवार आनंद बहिरु | कक्ष अधिकारी |
| ४) | श्री. सोनकांबळे सोमनाथ पांडूरंग | कक्ष अधिकारी |
| ५) | श्री. हैनाळकर मलकारसिध्द महादेव | कक्ष अधिकारी |
| ६) | श्री. कुलकर्णी गिरीष अनंत | विद्यापीठ अभियंता |
| ७) | श्री. चोरमले प्रशांत रावसाहेब | सिस्टिम ॲनालिस्ट |
| ८) | श्री. कोळी संतोष तुकाराम | कनिष्ठ अभियंता |
| ९) | श्री. खपाले राजीव उत्तम | लेखापाल |
| १०) | श्री. शिंदे शिवाजी नारायण | सहायक कुलसचिव |
| ११) | श्री. बनसोडे सुशील श्रीनिवास | प्रोग्रामर |
| १२) | श्री. चव्हाण आनंद मारुती | सिस्टिम ॲनालिस्ट |

व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि. १३ मे, २०१३ व दि.१६ मे, २०१३ रोजीच्या पत्रासोबत संबंधित अधिका-यांचे म्हणणे, ०१ ते २३ मुद्यांची माहिती व अपीलावरील विद्यापीठाचा अभिप्राय पाठविण्यात आले होते. त्यासंदर्भात महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. २६ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रात खालीलप्रमाणे नमूद करुन कळविले आहे. चौकशी अहवालातील निष्कर्ष विचार घेता खालील तक्त्यातील अ.क्र. ०९ व १० वरील अधिकारी/कर्मचा-यांना वगळता उर्वरित कर्मचा-यांचे नियुक्ती वैध असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यांचे वेतन निर्धारण नियमित करण्यात यावे व त्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्यता यावी. तसेच चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार सोबतच्या पत्रातील अनुक्रमांक ०९ व १० वरील श्री. चव्हाण आनंद मारोती व श्री. बनसोडे सुशिल श्रीनिवास हे सिस्टीम ॲनालिस्ट व प्रोग्रामर या पदासाठी आवश्यक असलेल्या अनुभवांच्या अटींची पूर्तता करीत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या नियुक्त्या अवैध ठरतात सदर पदासाठी विद्यापीठ हे नियुक्ती प्राधिकारी असल्यामुळे त्यांच्या नियुक्त्या समाप्त करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करण्यात यावी. नैसर्गिक न्यायातत्वांचा अवलंब केल्यानंतरच सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्रीमती अर्चना बाबासाहेब चोपडे | सहायक कुलसचिव |
| २) | श्री. कांबळे सुर्यकांत नंदकुमार | सहायक कुलसचिव |
| ३) | श्री. शिंदे शिवाजी नारायण | सहायक कुलसचिव |
| ४) | श्री. पवार आनंद बहिरु | कक्ष अधिकारी |
| ५) | श्री. सोनकांबळे सोमनाथ पांडूरंग | कक्ष अधिकारी |
| ६) | श्री. हैनाळकर मलकारसिध्द महादेव | कक्ष अधिकारी |
| ७) | श्री. खपाले राजीव उत्तमराव | लेखापाल |
| ८) | श्री. चोरमुले प्रशांत रावसाहेब | सिस्टिम ॲनालिस्ट |
| ९) | श्री. चव्हाण आनंद मारुती | सिस्टिम ॲनालिस्ट |
| १०) | श्री. बनसोडे सुशील श्रीनिवास | प्रोग्रामर |
| ११) | श्री. कुलकर्णी गिरीष अनंत | विद्यापीठ अभियंता |
| १२) | श्री. कोळी संतोष तुकाराम | कनिष्ठ अभियंता |

त्यानुसार श्री. चव्हाण आनंद मारुती व श्री. बनसोडे सुशील श्रीनिवास यांच्या सेवा समाप्त करण्यापूर्वी नैसर्गीक न्याय तत्वांची पुर्तता करण्यासाठी त्यांना त्यांच्या सेवा समाप्त का करण्यात येवू नयेत अशा आशयाची नोटीस देऊन नोटीसीचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर त्यांचा आणि शासन आदेशाचा विचार करुन पुढील कार्यवाही करावी लागेल.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ ऑगस्ट, २०१४ च्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठातील 'गट अ/ब' मधील अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतन अनुदान निर्धारणाबाबत केलेली कार्यवाही माहितीस्तव व पुढील कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **शासनाकडून अहवालाची प्रत मागवून घ्यावी. अ.क्र.९ व १० बाबत कायदेशीर अभिप्राय घेवून त्यानुसार कार्यवाही करावी. यानुसार दोन्ही कृती तातडीने आणि एकाच वेळी सुरु कराव्यात त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

## मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः

**[ १३(१) ] विद्यापीठ परिसरातील बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा सुरु करणेसाठी सोशल सायन्स या इमारतीमधील एक हॉल बँकेची शाखा व एटीएम सुरु करणेकरीता भाडेतत्वावर देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात आय. डी. बी. आय. बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे विद्यापीठ परिसरात बँक शाखा सुरु करण्याबाबतचा प्राप्त झालेले अर्ज व्यवस्थापन परिषद बैठक दि.३०/१०/२०१३ रोजी ठेवण्यात आलेला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला होता.

| | |
|---|---|
| **ठराव क्र. [६(४)]** | **विद्यापीठ परिसरात बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा सुरु करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेनंतर बँकेस ६,००० स्केअर फूट जागा देण्यासाठी मान्यता देण्यात आली.** |

उक्त ठरावाप्रमाणे विद्यापीठ परिसरात बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा सुरु करण्यासाठी बँकेस ६००० स्केअर फूट जागा भाडेतत्वावर बँकेस देण्यासाठी मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.११/११/२०१३ रोजी मान्यतेकरीता प्रस्ताव पाठविला आहे.

त्यानंतर मा.कुलगुरु महोदय यांनी दि.२०/०१/२०१४ रोजीच्या पत्रान्वये बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सुरु करणे साठी जमीन उपलब्ध करणेसाठी पत्राने कळविले होते. त्यास अनुसरुन शासनाकडून दि.०७/०३/२०१४ रोजीच्या पत्राअन्वये मुद्दा क्र. ०१ ते ०६ प्रमाणे माहिती मागविण्यात आलेली होती. त्यानुसार दि.०२/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सहा मुद्यांची माहिती कळविलेली होती.

शासनाच्या मान्यतेनंतर बँकेस जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर व माळढोक प्रकल्पातून शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्यावर बांधकामाचा प्लॅन मंजूर होऊन बांधकामास सुरुवात करण्यासाठी आणि बांधकाम पूर्ण होण्यासाठी बराच वेळ लागणार आहे. याचा विचार करता तात्पुरत्या स्वरुपात विद्यापीठ परिसरात एक हॉल बॅंक ऑफ महाराष्ट्र या बँकेची शाखा व एटीएम सुरु करणेस भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकरीता शासनास दि.०२/०५/२०१४ रोजी प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार दि.०२/०७/२०१४ रोजी शासनाकडून सदर तात्पुरत्या बदलास व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची आवश्यकता असल्याचे कळविण्यांत आले आहे.

सबब, उक्त ठरावाप्रमाणे ४८२ एकर जागेत बांधकाम पूर्ण होऊन बँक सुरु होईपर्यत विद्यापीठ परिसरात बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेची शाखा व एटीएम सुरु करणेकरीता सोशल सायन्सेस इमारतीमधील एक हॉल उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः ४८२ एकर मध्ये बांधकाम होऊन त्याठिकाणी महाराष्ट्र बँकेची शाखा सुरु होईपर्यंत विद्यापीठ परिसरातील सोशल सायन्सेस या इमारतीमधील एका हॉलमध्ये बँक ऑफ महाराष्ट्रची शाखा व एटीएम सुरु करणेकरीता भाडेतत्वावर देण्यास व त्यानुसार शासनाची मान्यता घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३(२) ] डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले यांनी सुवर्णपदकासाठी दिलेली देणगी स्विकारण्याची व सुवर्णपदकासाठी नियमावली तयार करण्याकरीता समिती गठन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः प्रा. डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले, विवेक,४ / १०, विद्यानगर, उत्तर सदर बाजार, सोलापूर यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये खाली नमुद केल्याप्रमाणे आई वडिलांच्या स्मरणार्थ दोन सुवर्णपदके सोलापूर विद्यापीठातर्फे देण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

| | |
|---|---|
| १. | एम. ए. (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस "**डॉ. निर्मलकुमार फडकुले**" सुवर्णपदक. |
| २. | बी. ए (भाग-१,२ व ३) मराठी विषयात एकूण गुणांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस "**श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले**" सुवर्णपदक. |

वर नमुद केलेल्या दोन्ही सुवर्णपदकाच्या प्रस्तावासंदर्भात विद्यापीठाच्या नियमानुसार सर्व तांत्रिक बाबीची तत्काळ पूर्तता करण्याची तयारीही संबंधितांनी दर्शविली आहे. सदरच्या प्रस्तावासोबत वर नमुद केलेल्या दोन्ही नावाने सुवर्णपदक देण्याकरीता डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले यांनी रु.२,००,०००/- (अक्षरी- दोन लाख) चा धनादेश पाठविला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ज) अन्वये प्राप्त झालेल्या देणग्या स्विकारण्याचा अधिकार हे व्यवस्थापन परिषदेस आहेत. त्याचप्रमाणे सदर सुवर्णपदकांसाठी नियमावली तयार करण्याकरिता समितीचे गठनही करावे लागणार आहे.

सबब, वरीलप्रमाणे प्रा. डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले, यांनी विद्यापीठास देवू केलेली देणगी स्विकारण्याची व सुवर्णपदकासाठी नियमावली तयार करण्याकरीता समिती गठन करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः डॉ. अजित निर्मलकुमार फडकुले यांनी एम. ए. (समग्र मराठी) प्रथम व व्दितीय वर्षात एकूण गुणात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस "डॉ. निर्मलकुमार फडकुले" या नावाने सुवर्णपदक व बी. ए. (भाग-१, २ व ३) मराठी विषयात एकूण गुणांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस "श्रीमती मंदाकिनी निर्मलकुमार फडकुले" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता देवू केलेली रु.२,००,०००/- देणगी स्विकारण्यास व सुवर्णपदकासाठी नियमावली तयार करण्याकरिता ॲड. श्री. सलगर बी. एस. व डॉ. देशमुख एम. एस. यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१३(३) ] ॲक्सीस बँक यांचे ॲग्रीगेटर PayU यांचेबरोबर नेट बँकिंग सुविधा उपलब्ध करणेसाठी Login Id चे अधिकार देण्याची वाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाकडे प्राप्त होणारी विविध प्रकारचे शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारणेसाठी ॲक्सीस बँक येथे खाते उघडण्यासाठी व पेमेंट गेट वे सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी दि.०७/१०/२०१३ रोजीच्या टिपणीस मा. कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिली होती. त्यानुसार ॲक्सीस बँक, शाखा डफरीन चौक येथे खाते उघडण्यात आले आहे. तसेच नेट बॅकिंग सेवा उपलब्ध करुन घेण्याकरिता ॲक्सीस बँकेची ॲग्रीगेटर संस्था PayU यांचे सोबत लिगल ॲग्रीमेट करुन घ्यावे असे शाखा व्यवस्थापक यांनी दि.२३/१०/२०१३ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(एफ) नुसार "विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे" यांचे अधिकार व्यवस्थापन परिषदेला आहेत. त्यानुसार बँकेच्या स्वाक्षरीचे अधिकार श्री. खपाले आर. यु., लेखापाल व श्री. रोकडे एम. एस., प्र. वित्त व लेखा अधिकारी यांना दिले असून तसे लिगल ॲग्रीमेंट करण्यास दि.३०/१०/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.६(३) अन्वये मान्यता दिली आहे.

तथापि, सदर बँक खात्यामध्ये होणारे रोजचे जमा पाहण्याकरिता (View only) श्री. संजय अनपट, प्र. वित्त व लेखाधिकारी, श्री. राजीव खपाले, लेखापाल व श्री. संतोष क्षिरसागर, सहा. कक्ष अधिकारी यांना अधिकार देणेकरिता सोबतच्या नमुन्याद्वारे ठराव करण्याबाबत बँकेने कळविले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे ॲक्सीस बँक येथे असणाऱ्या खात्यावर जमा होणाऱ्या जमा होणाऱ्या शुल्काचा तपशिल रोजच्या रोज पाहणे याकरिता वरील अधिकारी यांना Login id देऊन नेट बँकिंग सुविधा सुरु करणेसाठी वरीलप्रमाणे ठराव करणे आवश्यक आहे.

सबब, ॲक्सिस बँक यांनी कळविल्याप्रमाणे नेट बँकिंग सुविधा उपलब्ध होणेसाठी सोबत जोडलेल्या मसुद्याप्रमाणे ठराव बँकेस देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: ॲक्सीस बँक यांचे ॲग्रीगेटर PayU यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नेटबँकींग सुविधेत ॲक्सीस बँकेत दररोज खात्यावर होणाऱ्या जमा व शुल्काचा तपशील रोजच्या रोज पाहण्यासाठी खालीलप्रमाणे ठराव करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**RESOLVED THAT** the company do avail the ‘Corporate Internet Banking service ***(View Only)*** for the Account opened/to be opened with Axis Bank Limited (“the Bank”) under the ***Customer ID 850509008*** at their various branch(es) and the company do accept such terms, conditions, stipulation laid down by the Bank from time to time for the purpose.

**A/c No.: 913010047061848    A/c No.:914020029701933**

**A/c No.: 914020029700752**

**RESOLVED FURTHER THAT** the company do execute necessary documents, agreement form(s), authority letter(s) and / or any other related documents from time to time for this purpose and accept its terms and conditions including any modifications thereof.

**RESOLVED FURTHER THAT** the following officials be hereby singly / jointly authorized

to accept, sign, execute, deliver and complete all documentation, agreements, account opening forms, and accept and abide by the modifications and / or variations in any or all the terms and conditions from time to time and to nominate, substitute, revoke and vary mandate etc. from time to time and on behalf of the company, in order to apply for and avail and operate the 'Corporate internet Banking' facility provided by the Bank.

**RESOLVED FURTHER THAT** the Board is sware that the Bank was granting Customer level access and has now moved to Account level access to grant account level operational powers to the Board delegated Authorised Signatories.

| NAME | DESIGNATION |
|---|---|
| **Shri. Sanjay Anpat** | **Finance & Accounts Officer** |
| **Shri. Rajeev Khapale** | **Accountant** |
| **Shri. Santosh Kshirsagar** | **Asst.Section Officer** |

**RESOLVED FURTHER THAT** the above authorized officials are also authorized to perate on behalf of the company throught 'Corporate Internet Banking' service on the company's accounts under a Customer ID allotted by the Bank with a view only access and / or countinually operate the accounts(s) under the said particular Customer ID even when overdrawn, as per the access specifications authorized in Corporate Internet Banking form.

**RESOLVED FURTHER THAT** the Bank be and is hereby authorized to accept all instructions given or initiated through the 'Corporate Internet Banking' service through initiator and approver from all or any one of the above signatories in respent of company's accounts/s. The company does agree to hold Axis Bank harmless and indemnifies and agrees to keep the Bank's interest protected on account of the bank executing such intructions by the above signatories in the manner provided here in above.

**RESOLVED FURTHER THAT** a copy of this resolution be and hereby submitted the Bank dully certified by all or any of the persons so authorised by the Company / Corporate.

**[ १३(४) ] जम्मू काश्मीरातील महापूर नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मा. पंतप्रधान, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देणेची बाब विचारार्थ.**

(टिपणी: जम्मू काश्मीर येथे काही भागात अतिवृष्टी होवून फार मोठ्या प्रमाणात महापूर आल्याने या नैसर्गिक आपत्तीमूळे फार मोठी जिवित व वित्तहानी झाली आहे. तेव्हा सदर आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करण्याकरिता विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन (मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) मा. पंतप्रधान, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून देणे सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

सबब, जम्मू काश्मीरातील महापूर नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मा. पंतप्रधान, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देणेची बाब विचारार्थ).

**ठराव: जम्मू काश्मीरातील महापूरामुळे उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन (मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) मा. पंतप्रधान, सहायता निधीमध्ये देणगी देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३(५) ] संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये सोलापूर विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ सोलापूर संस्था नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिसुचना 2012 (Madatory Assessment and Accreditation of Higher Education Institutions) 2012 मधील तरतूदीस अनुसरुन Public Notice संदर्भ क्र. No.F.20-4/2009, 27 December, 2013, नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिपत्याखालील विद्यापीठाने दि.1 June, 2014 पूर्वी विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्यासाठी राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, नॅक बेंगलोर यांचेकडे LOI सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा 1 April, 2014 पासूनचे वित्तीय अनुदान खंडित करण्यात येईल असे कळविलेले आहे.

या अनुषंगाने विद्यापीठाचे मुल्यांकन व प्रामाणिकरण करुन घेण्यासाठी नॅक बेंगलोर यांना विद्यापीठाचे हेतू पत्र (LOI) स्वीकृत झालेले आहे. यास अनुसरुन विद्यापीठाचे माजी विद्यार्थी संघ असणे अनिवार्य आहे. याकरिता संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये, सोलापूर विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ सोलापूर संस्था नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेण्याची बाब मान्यतेस्तव).

ठरावः **सोलापूर विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ सोलापूर या नावाने संस्था नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३(६) ] परीक्षा विभागाकडील परीक्षा कालावधीत भरारी पथकाच्या कामासाठी भाडोत्री वाहने घेण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याबाबत मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर यांच्याबरोबर भाडोत्री वाहने घेण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागाकडील दि.१४/०८/२०१४ रोजीच्या मान्यतेस अनुसरुन वरील विषयांकित कामाकरिता दरकरार करण्यासाठी दै. दिव्य मराठी व दै. तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये दि.२८/०८/२०१४ रोजी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्राप्त होण्याची अंतिम दिनांक १८/०९/२०१४ ही होती. अंतिम दिनांकापर्यंत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | |
|---|---|
| १. | **मे. मल्लीकार्जून ट्रॅव्हल्स, सोलापूर** |
| २. | **मे. श्रध्दानंद टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, सोलापूर** |
| ३. | **मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर** |

सदरच्या निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा दि.२२/०९/२०१४ रोजी खरेदी समिती सदस्यांसमोर उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेल्या **मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर** यांना कामाचे आदेश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. सदर फर्मने खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

| | | |
|---|---|---|
| मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर कार १००० सी. सी. व त्यावरती | प्रति दिवसासाठीचे दर ३०० कि. मी. पर्यंत | प्रति कि. मी. चे दर |
| | अे. सी. सह रु.२३२५ = ०० | रु.८ = ०० |
| | नॉन अे. सी. रु.२१०० = ०० | रु.७ = ०० |
| मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर जीप नॉन अे. सी. | प्रति दिवसासाठीचे दर ३०० कि. मी. पर्यंत | प्रति कि. मी. चे दर |
| | रु.२९२५ = ०० | रु.१० = ०० |

मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर यांनी वरीलप्रमाणे दर दिले असून सदर कामासाठी वार्षिक अंदाजे रु.२,००,०००/- इतका खर्च येणार आहे. उपरोक्त काम सेवा पुरविणे या प्रकारात मोडत असल्याने सदरची बाब व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

सबब, **मे. बनशंकरी ट्रव्हल्स, सोलापूर** यांच्याबरोबर वार्षिक दरकरार करुन भाडोत्री वाहन घेण्यासाठी कामाचे आदेश देण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **परीक्षा विभागाकडील परीक्षा कालावधीत भरारी पथकाच्या कामासाठी भाडोत्री वाहने घेण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याबाबत मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर यांच्याबरोबर भाडोत्री वाहने घेण्याकरिता खालील दराप्रमाणे वार्षिक दरकरार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर कार १००० सी. सी. व त्यावरती** | **प्रति दिवसासाठीचे दर ३०० कि. मी. पर्यंत** | **प्रति कि. मी. चे दर** |
| | **अे. सी. सह रु.२३२५ = ००** | **रु.८ = ००** |
| | **नॉन अे. सी. रु.२१०० = ००** | **रु.७ = ००** |
| **मे. बनशंकरी ट्रॅव्हल्स, सोलापूर जीप नॉन अे. सी.** | **प्रति दिवसासाठीचे दर ३०० कि. मी. पर्यंत** | **प्रति कि. मी. चे दर** |
| | **रु.२९२५ = ००** | **रु.१० = ००** |
| **भरारी पथकाचे अध्यक्ष किंवा सदस्य यांनी स्वत:ची गाडी वापरल्यास त्यांना विद्यापीठ नियमानुसार गाडीभाडे मान्य करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | | |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |